# बॉटनीतील संशोधनाला आला वेग

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

**वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. एस. आर. यादव संशोधनासह वाचनात मग्न**



शिवाजी विद्यापीठात बोट्यानिकल गार्डन उभारले आहे. दुर्मिळ वनस्पती या गार्डनमध्ये विकसित करण्यात आल्या आहेत. हे गार्डन साकारण्यामध्ये मोलाचे योगदान दिलेले डॉ. एस. आर. यादव हे वनस्पतीशास्त्रातील तज्ज्ञ व शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पती शास्त्राचे माजी विभागप्रमुख. सध्या लॉकडाउनमुळे ते आपल्या सरनोबतवाडी परिसरातील घरी आहेत. विभागप्रमुख पदाची जबाबदारी, विद्यापीठाशी निगडीत वनस्पतीशास्त्रातील संशोधन, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन या सगळ्या कामांमध्ये राहून गेलेले वनस्पतीशास्त्रातील रिसर्च करण्यात सध्या ते आपले दिवसभरातील १५ ते १६ तास देत आहेत.

यापूर्वी वनस्पतीशास्त्रातील संशोधनाच्या प्रवासात त्यांनी हजारो छायाचित्रे कॅमेरामध्ये बंदिस्त केली आहेत. सध्या संचारबंदीमुळे डॉ. यादव हे या सर्व छायाचित्रांची विभागणी करून त्यातील फोटोमध्ये असणाऱ्या विविध दुर्मिळ वनस्पतींची माहिती नोंदवून त्याच्यावर संशोधन करण्याचे काम करण्यात आपला दिवस सत्कारणी लावत आहेत. डॉ. यादव यांचं वनस्पतीशास्त्रातील काम अत्यंत महत्त्वाचे असे आहे. गेली ३५ वर्षे ते हे वनस्पतीचा अभ्यास करत आहेत. आज वयाच्या ६६ व्या वर्षीही अनेक दुर्मिळ वनस्पतींची माहिती संकलित करण्यामध्ये त्यांचे निवृत्तजीवन अत्यंत मजेत जात आहे. सेवानिवृत्तीनंतर त्यांचा अधिकाधिक वेळ हा वनस्पतीशास्त्रातील संशोधनासाठी व्यतीत होत असून सध्या संचारबंदी काळामध्ये त्याला अधिक वेग आला आहे.

**सत्कारणी लागतो दिवस**

डॉ. यादव मूळचे कराड तालुक्यातील. मुंबई-गोवा दिल्ली येथील विद्यापीठांमध्ये प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागातून ते निवृत्त झाले. कोणतीही नवी वनस्पती दिसली की तिचा खोलवर अभ्यास करण्याचा डॉ. यादव यांचा छंद सध्या संचारबंदीमध्ये अधिकच बहरला आहे. आपल्या घराच्या अंगणात त्यांनी बाग फुलवली असून यामध्ये नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या सुमारे चारशे वनस्पती वाढवल्या आहेत.

वनस्पती अभ्यासानिमित्त केलेल्या भटकंतीमध्ये नोंदी आणि फोटो त्यांनी काढले आहेत. सध्या या फोटोंचे वर्गीकरण करून त्यांची माहिती संकलित करुन पुस्तक लिहिण्याचा त्यांचा विचार आहे. त्याचे हे लेखन सध्या सुरू आहे. सध्या डॉ. यादव यांच्याकडे काही संशोधक विद्यार्थी मार्गदर्शन घेत आहेत. आपल्या संशोधनातून या विद्यार्थ्यांनाही मार्गदर्शनासाठी वेळ देत आहेत. लेखनासोबत सध्या 'सेपीयनस' या पुस्तकाचे वाचन करत आहेत. मानवाने विविध अडचणींवर केलेली मात या मध्यवर्ती कल्पनेवर बेतलेले हे पुस्तक सध्या करोनासारख्या संसर्ग आजाराच्या परिस्थितीवर मानव कसा मात करणार याबाबत उत्सुकता निर्माण करणारे आहे. आकाशवाणीवरील गाणी, शास्त्रीय गाण्यांवर आधारित कार्यक्रम ऐकण्यातही ते वेळ घालवत आहेत.

**वनस्पतीविषयक पुस्तके संग्रही**

डॉ. यादव यांच्या घरी त्यांचे स्वतःचे ग्रंथालय असून त्यामध्ये जवळपास पन्नास देशांतील वनस्पतीविषयक पुस्तके त्यांनी संग्रही ठेवलेली आहेत. वाचन-लेखन, वनस्पतींविषयीचे संशोधन, दुर्मिळ वनस्पतींच्या छायाचित्रांचे वर्गीकरण अशा कामात डॉ. यादव यांचा दिवस खूप आनंददायी जात आहे.

# होस्टेलमधील आयसोलेशन कक्षात २८ रुग्ण क्वारंटाइन

मटा प्रतिनिधी कोल्हापूर

## विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाच्या होस्टेलमध्ये सोय

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील वसतिगृहामध्ये मंगळवारी करोना संशयित २८ रुग्णांना क्वारंटाइन करण्यात आले. या ठिकाणी या रुग्णांवर प्राथमिक उपचार करण्यात येणार असून त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहाचा उपयोग आयसोलेशन रुग्णालय म्हणून करण्याबाबत जिल्हा प्रशासनाने विद्यापीठाला प्रस्ताव दिला होता.

या प्रस्तावाला प्रतिसाद देत विद्यापीठाने तंत्रज्ञान विभागातील मुलांच्या वसतिगृहात एक हजार बेडचे आयसोलेशन कक्ष तयार केले होते. करोनाची रुग्णसंख्या वाढल्यास शहरातील तसेच उपनगरातील रिकाम्या इमारतींचा वापर आयसोलेशन कक्षासाठी करण्याबाबत जिल्हा प्रशासनाने नियोजन केले आहे व यानुसारच मंगळवारी २८ रुग्णांची रवानगी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील वसतिगृहात स्थापन करण्यात आलेल्या आयसोलेशन रुग्णालयात करण्यात आली आहे. या ठिकाणी रुग्णांवर वैद्यकीय उपचार केले जाणार असून रुग्णांना आवश्यक पाणी तसेच स्वच्छतागृह ची सोय विद्यापीठ प्रशासन पुरवणार आहे.

दरम्यान, विद्यापीठाच्या क्रमांक १, २ व ३ या मुलांच्या वसतिगृहातील ५०० बेडची व्यवस्थाही आयसोलेशन कक्ष म्हणून तयार करण्याबाबत प्रस्ताव देण्यात आला आहे. याची कार्यवाही येत्या दोन दिवसात सुरू होणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.



# संचारबंदीत वन्यजीवांचा मुक्त संचार !

## जिल्ह्यात सायलेंट झोन तयार, जैवविविधतेचे विविध पदर नजरेत

**» जागतिक वसुंधरा दिन विशेष...**

**संदीप खांडेकर** : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २१ : कोरोनाच्या संचारबंदीने पाणी व हवा प्रदूषणात घट झाली असून, पक्षी व प्राण्यांचा मुक्त संचार कौतुकाचा विषय झाला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील निसर्गरम्य वातावरणात कमालीचा 'सायलेंट झोन' तयार झाला असला तरी लॉकडाउन उठल्यानंतर तो किती काळ टिकेल, याभोवती चर्चेचा माहोल आहे. जागतिक वसुंधरा दिनाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने वसुंधरेसह जैवविविधतेच्या संवर्धनाची चळवळ बळकट होण्याची अपेक्षा व्यक्त होते. त्यासाठी प्रदूषण करण्यापासून प्रत्येकाने स्वतःला लॉकडाउन करावे, असा पर्यावरणप्रेमींचा सूर आहे.**

कोरोनाच्या संचारबंदीने साखर कारखाने, उद्योगधंदे बंद आहेत. प्रदूषणाला हातभार लावणाऱ्या व्यवसायांमुळे प्रदूषणात घट झाल्याचे अभ्यासातून पुढे आले. जिल्ह्यातील जैवविविधतेचे पदरही उलगडले जात आहेत. गगनबावडा, पन्हाळा, आजरा, चंदगड परिसरात गवा, मोर, कोल्हे रस्त्यावर येणे नित्याचे झाले. हत्तींनीही जंगलातून रस्त्यावर धाव घेतली आहे. पंचगंगा नदीत मगरींचे दर्शन होते. त्याचबरोबर गर्दीने नेहमी गजबजलेल्या परिसरात पक्ष्यांच्या किलबिलाटाचे स्वर कानावर येऊ लागले आहेत. पाणी व हवा प्रदूषणावरही लगाम बसला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी



**कोल्हापूर : उन्हाचा तडाखा बसू लागल्याने शहरवासीय घामाघूम होऊ लागले आहेत. उन्हाची झळ पक्ष्यांनाही बसत आहे. पुणे-बंगळूर महामार्गालगतच्या शेतात उन्हापासून बचाव करण्यासाठी झाडाच्या सावलीत थांबलेले मोर.** (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

प्रदूषणातील घट महत्त्वाची मानली जाते. नेमके तेच या काळात घडत आहे.

शिवाजी विद्यापीठात १३५ प्रकारचे पक्षी, ३१ सरपटणारे व १४ उभयचर प्राणी, ५९ फुलपाखरांचे प्रकार, तर ९९ प्रकारच्या झाडांच्या प्रजातींची नोंद आहे. संचारबंदीतील नीरव शांततेने पक्ष्यांच्या थव्यांचा

**“ संचारबंदीने पर्यावरणातील बदल नजरेत येत आहेत. वसुंधरेच्या संवर्धनासाठी पोषक वातावरण बनले. ते टिकविण्याची जबाबदारी प्रत्येकावर आहे.**
**- डॉ. पी. डी. राऊत,**
विभागप्रमुख, पर्यावरणशा

संचार विद्यापीठात पाहाय

याबाबत वन्यजीव अभ्यासक उमाकांत चव्हाण म्हणाले, ''कोरोनामुळे १९५ देशांत संचारबंदी आहे. या परिस्थितीने नागरिकांना त्यांच्या गरजांचा अंदाज आला. नेमक्या याच वेळेत त्यांनी पर्यावरणाच्या समतोलसाठी काय करायला हवे, याचा आराखडा करावा. वसुंधरेच्या संवर्धनाच्या मोहिमेसाठी पाण्याचे स्रोत योग्य प्रमाणात वापरणे, वनांचे आच्छादन वाढविणे, दाट जंगलात घर बांधणे टाळणे, या गोष्टींचे पालन केले तर खूप मोठा बदल होऊ शकतो.''

# तंत्रज्ञान विभागात २८ जण क्वारंटाईन



प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागामधील वसतीगृहामध्ये मंगळवारी २८ जणांना क्वारंटाईन केले आहे. या २८ जणांची सर्व काळजी प्रशासनाच्या वतीने घेतली जात आहे. दरम्यान सोमवारी प्रशासनाने ताब्यात घेतलेल्या विद्यापीठातील ३ वसतीगृहांची पाहणीही केली असून या ठिकाणी १ हजार बेड उभारण्याची तयारीही सुरु आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने १ हजार बेडचे हॉस्पीटल विद्यापीठातील वसतीगृहामध्ये उभारण्याची मंजुरी प्रशासनास दिली होती. यानुसार विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाच्या वसतीगृहाची इमारत प्रशासनाने मागील आठवड्यात ताब्यात घेतली होती. या ठिकाणी ५०० बेडचे आयसोलेशन रुग्णालय उभे करण्यात आले होते. मंगळवारी या ठिकाणी २८ संशयितांना क्वारंटाईन करुन ठेवण्यात आले आहे. प्रशासनाच्या वतीने या २८ जणांची योग्य ती खबरदारीही घेतली जात आहे.

सोमवारी विद्यापीठातील मुलांची ३ वसतीगृहे प्रशासनाने आयसोलेशन रुग्णालयासाठी ताब्यात घेतली होती. मंगळवारी सकाळी अधिकाऱ्यांनी या हॉस्टेलची पाहणी केली. लवकरच या हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांचे साहित्य स्थलांतरीत करण्यात येणार आहे. या तीनही वसतीगृहांमध्ये आयसोलेशन रुग्णालय स्थापन करण्याचे काम युद्धपातळीवर सुरु करण्यात येणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

लोकमत

करणार आहे.

# विद्यापीठात २८ जणांचे 'क्वारंटाईन'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील वसतिगृहामधील आयसोलेशन रुग्णालय- कक्षामध्ये २८ जणांचे संस्थात्मक विलगीकरण (इन्स्टिट्यूशनल क्वारंटाईन) करण्यात आले आहे. नवीन पाचशे बेडचे आयसोलेशन रुग्णालय तयार करण्यात येणाऱ्या मुलांच्या तिन्ही वसतिगृहांची पाहणी जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून मंगळवारी करण्यात आली. जिल्हा प्रशासनाने एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील दोन वसतिगृहे ताब्यात घेतली. त्यातील एका वसतिगृहामध्ये आवश्यक सुविधांची पूर्तता केल्यानंतर सोमवारी सायंकाळी २८ जणांना क्वारंटाईन करण्यात आले आहे. विद्यापीठातील मुलांचे वसतिगृह क्रमांक एक, दोन आणि तीनमध्ये आणखी पाचशे बेडचे आयसोलेशन रुग्णालय-कक्ष तयार केला जाणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी या वसतिगृहांची पाहणी केली. वसतिगृहातील साहित्य अन्य ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी आवश्यक पॅकिंगचे साहित्य जिल्हा प्रशासनाकडून दिले जाणार आहे. दोन दिवसांमध्ये वसतिगृहांतील साहित्य स्थलांतरित केले जाणार आहे.

Hello Kolhapur
Page No. 1 Apr 22, 2020
Powered by: erelego.com

पुढारी

# विद्यापीठ वसतिगृहात २७ जण क्वारंटाईन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या टेक्नॉलॉजी डिपार्टमेंटच्या वसतिगृहात रुग्णालय उभारण्यात येणार आहे. त्याची प्रक्रिया सुरू झाली असून मंगळवारी या वसतिगृहात २७ जणांना इन्स्टिट्यूशनल क्वारंटाईन करण्यात आले आहे.

जिल्ह्याला 'कोरोना'चा धोका कायम आहे. जिल्ह्यात आजअखेर १० रुग्ण आढळले आहेत. रुग्णसंख्या वाढली तर त्यांच्यावर उपचारासाठी रुग्णालये कमी पडू नयेत, यासाठी जिल्हा प्रशासनाने शिवाजी विद्यापीठाच्या टेक्नॉलॉजी डिपार्टमेंटचे वसतिगृह अधिग्रहीत केले आहे.

Kolhapur Edition
22 Apr, 2020 Page No. 8
Powered by : erelego.com



कोल्हापूर : जागतिक वसुंधरा दिन अर्थात वसुंधरेवरील जैवविविधतेच्या संवर्धनाची जाणीव बळकट करून देणारा दिवस. यंदा कोरोनाच्या संचारबंदीने वसुंधरेचे अनोखे रूप पाहायला मिळत आहे. कोल्हापुरातील प्रदूषण कमी झाल्याने स्वच्छ दिसत असलेली पंचगंगा नदी. दुसऱ्या छायाचित्रात शिवाजी विद्यापीठात नजरेत भरणारा मोरांचा मुक्त संचार.
(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

लोकमत

# कुलगुरु निवडीची प्रक्रिया लांबणार

## शिवाजी विद्यापीठ : जूनमध्ये प्रभारींकडे कार्यभार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील लॉकडाऊनमुळे शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरु निवडीची प्रक्रिया लांबणार असल्याचे दिसत आहे. निवड समितीवर पाठविण्यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन आणि विद्या परिषदेने निश्चित केलेल्या सदस्याची माहिती कुलपती कार्यालयाला कळविली आहे. मात्र, त्यापुढील कार्यवाही थांबली आहे.

या विद्यापीठाचे बारावे कुलगुरु म्हणून डॉ. देवानंद शिंदे यांचा पाच वर्षांचा कालावधी येत्या जूनमध्ये संपणार आहे. विद्यापीठाच्या कुलगुरु निवडीची प्रक्रिया सुरु झाली आहे. त्यातील निवड समितीवर पाठविण्यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन आणि विद्या परिषदेने संयुक्त बैठक घेऊन दि.२३ जानेवारी रोजी प्रा. अश्विनीकुमार नांगिया यांचे नाव निश्चित केले. त्याची माहिती कुलपती कार्यालयाला कळविण्यात आली आहे. त्यापुढे काहीच कार्यवाही झालेली नाही. कोरोनाबाबतची सद्य:स्थिती लक्षात घेता कुलगुरु निवडीची प्रक्रिया लांबणीवर पडणार असल्याचे दिसत आहे. या कुलगुरुंच्या मुदतीबरोबर प्र-कुलगुरुंची मुदत संपणार आहे. विद्यमान कुलगुरुंचे पद रिक्त होण्याच्या संभाव्य दिनांकाच्या एक महिना आधी नव्या कुलगुरुंच्या निवडीची प्रक्रिया पूर्ण करण्याचा संकेत आहे. त्यामुळे नव्या कुलगुरुंची निवड या मुदतीमध्ये झाली नाही, तर प्रशासनाला प्रभारी कुलगुरु आणि प्र-कुलगुरु यांची निवड करावी लागणार आहे. दरम्यान, व्यवस्थापन आणि विद्या परिषदेने निश्चित केलेल्या प्रा. नांगिया यांच्या नावाची माहिती फेब्रुवारीमध्ये कुलपती कार्यालयाला कळविले असल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी मंगळवारी सांगितले.